**आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००३

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ६९

दिनांक - ०७/११/२०२५

| अ.क्र | विषय क्र | विषय |
|---|---|---|
| १ | ६४५ | "बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा व नविन रस्ते विकसित करणे" सन २०२५-२६ अंतर्गत ई निविदा क्र.१२१६७१४-१,अहिल्यानगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१५ मधील कबाडे घर ते शिंदे घर ते झारेकर घर ते साळवे घरापर्यत रस्ता विकसित करणे या निविदेच्या मंजुरीबाबत. |
| २ | ६४६ | "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात विकास कामे करणे" सन २०२४-२५ अंतर्गत ई निविदा क्रमांक ११९६४९१-०६ ,अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १५ मधील लिंक रोड जवळील साईदिप सोसायटी व इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणेव ३०० mm व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या निविदेच्या मंजुरीबाबत. |
| ३ | ६४७ | ई नि.क्र.११९६४९१-१६ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२ मधील संत नामदेव चौक ते पाउलबुध्दे शाळा मुळे इस्टेट ते तपोवन रोड अंतर्गत रस्ता विकसीत करणे. |
| ४ | ६४८ | अहिल्यानगर मनपा हद्दीतील टी.पी.स्कीम नं.३ प्लॉट नं.८ स.नं.१४४ या ठिकाणी व्यायामशाळा बांधणे या कामासाठी 'नविन इमारती ' या लेखाशिर्षात खर्चाच्या तरतूदीमध्ये रक्कम रू.१२५.००लक्षची वाढीव तरतूद करणेबाबत. |
| ५ | ६४९ | अहिल्यानगर महानगरपालिका ,जिल्हा-अहिल्यानगर यांचे क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व विविध ठिकाणी वीज खर्चात बचत होण्यासाठी सौर विदयुत व्यवस्था उभारणे बाबत महाप्रित यांनी सादर केलेला करारनामा (MoU) मंजुरी मिळणे बाबत. |
| ६ | ६५० | मौजे सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ मधील खुली जागा (ओपनस्पेस ) अहमदनगर कॅन्सर सोसायटी,अहिल्यानगर या संस्थेस कॅन्सर समुपदेशन केंद्र व वाचनालयासाठी मिळणे बाबत. |
| ७ | ६५१ | मौजे सावेडी नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३मधील खुली जागा (ओपनस्पेस) क्षेत्र २४८२.४० चौ.मी.या जागेवर योगा हॉल बांधणेसाठी योग विदया धाम संस्थेस परवानगी मिळणे बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६४५ विषय क्र - ६४५

दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

---

**विषय :-** "बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा व नविन रस्ते विकसित करणे" सन २०२५-२६ अंतर्गत ई निविदा क्र.१२१६७१४-१,अहिल्यानगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१५ मधील कबाडे घर ते शिंदे घर ते झारेकर घर ते साळवे घरापर्यत रस्ता विकसित करणे या निविदेच्या मंजुरीबाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार

१. प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी ,अहिल्यानगर यांचेकडील प्रशासकीय मान्यता जा.क्र.०/२०२५Aug/ECL/०३२४७ दि.२५/०८/२०२५

२.ई.नि. क्र. १२१६७१४-१ सन २०२५-२०२६

३.निविदा विक्री कालावधी :- दि.०९/०९/२०२५ ते १६/०९/२०२५

४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.०९/०९/२०२५ ते १६/०९/२०२५

५.निविदा उघडण्याची तारीख :- दि.१८/०९/२०२५

६.कामाची मुदत : ५ महीने.

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल दि.३०/०९/२०२५ राजीच्या तांत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम gst व्यतिरिक्त (सुधारीत अंदापत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र, १२१६७१४-१ | ,अहिल्यानगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१५ मधील कबाडे घर ते शिंदे घर ते झारेकर घर ते साळवे घरापर्यत रस्ता विकसित करणे या निविदेच्या मंजुरीबाबत. | २७,९१,८२९/- | श्री.राहुल साहेबराव बोरूडे अहिल्यानगर<br>श्री.वृषभ अजय म्हसे अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने<br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराने | श्री.वृषभ अजय म्हसे अहिल्यानगर निविदा दरापेक्षा ०.०१ % कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र. ५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. वृषभ अजय म्हसे ,भवानीनगर,अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

तरी श्री. वृषभ अजय म्हसे ,भवानीनगर,अहिल्यानगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६४६ विषय क्र - ६४६

दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय :-** "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात विकास कामे करणे" सन २०२४-२५ अंतर्गत ई निविदा क्रमांक ११९६४९१-०६ ,अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १५ मधील लिंक रोड जवळील साईदिप सोसायटी व इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणेव ३०० mm व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या निविदेच्या मंजुरीबाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार , उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी ,अहिल्यानगर यांचेकडील प्रशासकीय मान्यता जा.क्र.COLAHM-३००११(३७) /१/२०२५/१/१२३७२३८/२०२५ दि.१३/०५/२०२५

२.ई.नि. क्र. ११९६४९१-०६ सन २०२५-२०२६

३.निविदा विक्री कालावधी :- दि.०२/०७/२०२५ ते १८/०८/२०२५

४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ०२/०७/२०२५ ते १८/०८/२०२५

५.निविदा उघडण्याची तारीख :- दि.२०/०८/२०२५

६.कामाची मुदत : ८ महीने.

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल दि.०९/१०/२०२५ राजीच्या तांत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम gst व्यतिरिक्त (सुधारीत अंदापत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र, ११९६४९१-०६ | अहिल्यानगर महानगरपलिका पलिका हद्दीतील प्रभाग क्र. १५ मधील लिंक रोड जवळील साईदिप सोसायटी व इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे व ३०० एम.एम.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | ८३,१६,८५०/- | श्री.चेतन मारूती जाधव, अहिल्यानगर<br>श्री.महेश दिपक व्यापारी,जेल रोड, अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने<br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१०% कमी दराने | श्री, महेश दिपक व्यापारी ,जेल रोड, अहिल्यानगर निविदा दरापेक्षा ०.०१ % कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र. ५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. महेश दिपक व्यापारी , अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

तरी श्री.महेश दिपक व्यापारी, अहिल्यानगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६४७ विषय क्र - ६४७
दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

---

**विषय :-** ई नि.क्र.११९६४९१-१६ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२ मधील संत नामदेव चौक ते पाउलबुध्दे शाळा मुळे इस्टेट ते तपोवन रोड अंतर्गत रस्ता विकसीत करणे

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार ,

लेखाशिर्षक - नागरी स्थानिक स्वराज्य सं.प.ना सेवा व सुविधेची कामे करणे -२०२४-२५

१. प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी यांची दि.१२/०५/२०२५ रोजीची मान्यता
२.ई.नि. क्र. ११९६४९१-१६
३.निविदा विक्री कालावधी :- दि.०२/०७/२०२५ ते ०९/०७/२०२५
४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ०२/०७/२०२५ ते ०९/०७/२०२५
५.निविदा उघडण्याची तारीख :- दि.११/०७/२०२५
६.कामाची मुदत : १० महीने.
७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल दि.०९/१०/२०२५ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम gst व्यतिरिक्त (सुधारीत अंदापत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र, ११९६४९१-१६ | ई नि क्र, ११९६४९१-१६ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२ मधील संत नामदेव चौक ते पाउलबुध्दे शाळा मुळे इस्टेट ते तपोवन रोड अंतर्गत रस्ता विकसीत करणे | १,०५,७६,६७६/- | श्री.राहुल साहेबराव बोरूडे अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने | श्री.चेतन मारूती जाधव अहिल्यानगर निविदा दरापेक्षा ०.०१०% कमी दराने |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव अहिल्यानगर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१०% कमी दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र. ५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. चेतन मारूती जाधव,अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१०% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

तरी श्री.चेतन मारूती जाधव,अहिल्यानगर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१०% कमी दराची निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६४८ विषय क्र - ६४८

दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर मनपा हद्दीतील टी.पी.स्कीम नं.३ प्लॉट नं.८ स.नं.१४४ या ठिकाणी व्यायामशाळा बांधणे या कामासाठी 'नविन इमारती ' या लेखाशिर्षात खर्चाच्या तरतूदीमध्ये रक्कम रू.१२५.००लक्षची वाढीव तरतूद करणेबाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी 'नविन इमारती ' या लेखाशिर्षात रक्कम रू.५०.००लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षात आज अखेर खर्च झालेला नाही. सदर लेखाशिर्षातून अहिल्यानगर मनपा हद्दीतील टी.पी.स्क्रीम नं.३ प्लॉट नं.८ स.नं.१४४ या ठिकाणी व्यायामशाळा बांधणेचे काम प्रस्तावित करावयाचे आहे. सदर कामासाठी रक्कम रू.१,७१,९४,९३९/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर लेखाशिर्षातील कमी अधिक रकमेचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२५-२६ ची मुळ तरतुद (लाखात ) | यापुर्वीचा खर्च (लाखात ) | शिल्लक (लाखात ) | प्रस्तावित केलेली वाढीव रक्कम (लाखात ) | एकुण तरतूद (लाखात ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नविन इमारती | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १२५.०० | १७५.०० |

सदर तरतूदीमध्ये वाढ करणेसाठी खाली नमूद लेखाशिर्षातून चालू आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेली तरतूद कमी करणेस हरकत नाही. सदर लेखाशिर्षातून यापूर्वी 'अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतून काम करणे ' या लेखाशिर्षातील खर्चासाठी रक्कम रू.३००.००लक्ष वापरणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून सदर रिपोर्ट नगररचना विभागाकडे प्रलंबित आहे. सदर लेखाशिर्षातून उक्त कामासाठी रकाना क्र.५ मध्ये नमूदप्रमाणे तरतूद करणेस हरकत नाही.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२५-२६ ची मुळ तरतुद | यापुर्वीचा खर्च | प्रस्तावित कामासाठी कमी करावयाची रक्कम | कमी करावयाची एकुण रक्कम (५+६ ) | सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रस्ते खादाई फि मधून रस्ते करणे /दुरूस्ती | ६००००००० | ३३००७७३७ | १२५००००० | ४५५०७७३७ | १४४९२२६३ |

उक्तप्रमाणे "नविन इमारती " या लेखाशिर्षात मुळ तरतूदीसह रक्कम रू.१७५.०० लक्षची वाढीव तरतूद करणेस  मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा. महासभे पुढे सादर.

-------------------------------------------------------------------------------------------

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६४९ विषय क्र - ६४९
दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका ,जिल्हा-अहिल्यानगर यांचे क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व विविध ठिकाणी वीज खर्चात बचत होण्यासाठी सौर विदयुत व्यवस्था उभारणे बाबत महाप्रित यांनी सादर केलेला करारनामा (MoU) मंजुरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांच्या पिण्याच्या पाणी पुरवठा योजना, शहरातील भुयारी गटर योजना तसेच महानगरपालिकेच्या आस्थापना इमारती व ठिकाणे आहेत तर काही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी काही उदंचन केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच शहरातील भुयारी गटर योजनेअंतर्गत मल शुध्दीकरण केंद्रे उभारण्यात आली असून काही नविन योजना प्रस्तावित आहेत.

महानगरपालिकेच्या कराव्या लागत असलेल्या वीज देयकांवरील खर्चात कपात करण्यासाठी या केंद्राच्या ठिकाणी सौर विद्युत व्यवस्था उभारणे प्रस्तावित आहे. शहरातील भुयारी गटार योजनेअंतर्गत, पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेअंर्तत उभाण्यात आलेल्या उपकरणांचा विद्युत भार (Connected Load) तसेच वापरात येणारे युनिट (Constumption Kwh) गोषवारा नुसार तसेच प्राथमिक माहिती नुसार या सर्व ठिकाणी अंदाजे १४००KWP (१४.०MWP) एवढी सौर विद्युत व्यवस्था उभारणे शक्य आहे.

"महाप्रित" च्या अखत्यारीत उपरोक्त ठिकाणी शासकीय कार्यक्रमाअंतर्गत सौर विद्युत व्यवस्था उभारणेसाठी सहकार्य करावे. यामुळे महानगरपालिकेला कराव्या लागत असलेल्या वीज खर्चात बचत तर होईलच शिवाय वीज निर्मितीचे राष्ट्रीय उदिष्टही सफल होईल. असे पत्र "महाप्रित" यांना पाठविले होते. त्या अनुषंगाने "महाप्रित" यांचे पत्र प्राप्त झाले असून विषयांकित बाबत शासकीय कार्यक्रमाअंतर्गत सौर विद्युत व्यवस्था उभारणेसाठी काम करणेस तयार असले बाबत सहमती दर्शविली असून सोबत करारनाम्याचा नमुना Memorandum of Understanding (MoU) स्वाक्षरी दिनांक कळविणे बाबत सादर केलेला आहे.

तरी अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व विविध ठिकाणी वीज खर्चात बचत होण्यासाठी विविध ठिकाणी सौर विद्युत व्यवस्था उभारणे करिता

मा.व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले नुतनीकरण उर्जा आणि पायाभुत सुविधा तंत्रज्ञान मर्यादित (महाप्रित) यांनी सादर केलेला (MoU) स्वाक्षरी करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६५० | विषय क्र - ६५०
दिनांक :- ०७/११/२०२५ | विभाग- नगररचना विभाग

---

**विषय :-** मौजे सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ मधील खुली जागा (ओपनस्पेस ) अहमदनगर कॅन्सर सोसायटी,अहिल्यानगर या संस्थेस कॅन्सर समुपदेशन केंद्र व वाचनालयासाठी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,डॉ.श्री.उज्वल सोनवणे ,रा.फुलारी मळा ,सावेडी ,अहिल्यानगर मौजे सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा अहमदनगर कॅन्सर सोसायटी,अहिल्यानगर या संस्थेस कॅन्सर समुपदेशन केंद्र व वाचनालयासाठी परवानगी मिळणे बाबत डॉ.श्री.उज्वल सोनवणे यांनी विनंती अर्ज केलेला आहे.

विषयांकीत मौजे सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ ही जमीन शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेमध्ये रहिवास विभागात असून या जागेच्या रेखांकनास या कार्यालयाने पत्र क्र.६३९२ दि.०३/०९/२०१६ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर रेखांकनातील खुली जागेचे क्षेत्र १६०४.०८ चौ.मी.इतके आहे. सदर खुल्या जागेवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद लावण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक ०२/१२/२०२० राजीच्या अधिसुचनेव्दारे लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्र.३.४.७ मधील तरतुदी स्पष्ट आहेत. उक्त नियमावतील तरतुदीनुसार रेखांकनातील खुल्या आहेत. अनुज्ञेय असलेले वापरच बंधनकारक आहे. तथापि मंजुर रेखांकनातील खुली जागा ही रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असून ते इतर कोणासही विक्री अथवा भाडयाने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

मा.महासभेच्या ठरावान्वये मंजुर रेखांकनातील खुली जागा,उदयान विकसित करणे देखभाल व दुरूस्ती करणे खेळण्या बसविणे,लॉन विकसित करणे,बाकडे बसविणे,स्ट्रीट लाईट ,पाणी व्यवस्था करणे इत्यादी करिता सामाजिक व स्वयंसेवी संस्था यांनी विकसित करणेसाठी तयारी दर्शविल्यास अशा प्रकारे प्राप्त होणा-या प्रस्तावांवर मा.आयुक्त यांनी निर्णय घेवून कार्यवाही करणेस मा.महासभेने ठराव क्र.५६ दिनांक १८/०२/२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब खाली अटींच्या अधीन राहुन सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ खुली जागा १६०४.०८ चौ.मी.अहमदनगर कॅन्सर सोसायटी,अहिल्यानगर यांना परवानगगी देण्यास हरकत नाही.

१.विषयांकीत खुल्या जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. सदर जागेचा कोणत्याही वाणीज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

२.विषयांकित खुल्या जागेचा नियमबाहय अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकस्न परवानगी रद्द करून खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

३.सदर रेखांकनातील खुली जागा भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

४.विषयांकित खुली जागा मंजुर रेखांकनातील भुखंडधारकांस /नागरीकांस विनामुल्य वापर करून देणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५.विषयांकित खुल्या जागेची मालकी अहिल्यानगर महानगरपालिकेचीच राहिल.

६.ओपन स्पेसमध्ये केवळ खुली जागा म्हणून वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

महानगरपालिकेची online परवानगी घेतल्या शिवाय कुठलेही बांधकाम करता येणार नाही.

नमुद अटींवर मंजुर रेखांकनातील सावेडी स.नं.२४८/६,२४८/७ खुली जागा १६०४.०८ चौ.मी. खुली जागा कॅन्सर समुपदेशन केंद्र व वाचनालयासाठी ९ (नऊ) वर्ष कालावधी करीता दरमहा भाडे रू.१ व अनामत रक्कम १२ रू.घेवून अर्जदार अहमदनगर कॅन्सर सोसायटी,अहिल्यानगर यांना देणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६९**

मा.प्रशासक ठराव क्र. ६५१ विषय क्र - ६५१
दिनांक :- ०७/११/२०२५ विभाग- नगररचना विभाग

---

**विषय :-** मौजे सावेडी नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३मधील खुली जागा (ओपनस्पेस) क्षेत्र २४८२.४० चौ.मी.या जागेवर योगा हॉल बांधणेसाठी योग विदया धाम संस्थेस परवानगी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, योग विद्या धाम संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.सुभाष पांढरे,सावेडी नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३ मधील खुली जागा (आपनस्पेस ) क्षेत्र २४८२.४० चौ.मी.या जागेवर योगा हॉल बांधणेसाठी विनंती अर्ज केलेला आहे. विषयांकित मौजे सावेडी नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३ ही जमीन शहराच्या मुळ हद्दीच्या मंजुर विकास योजनेमध्ये रहिवास विभागात असुन सदर जागा महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या मालकीची आहे. सदर जागेच्या रेखांकन मंजुर असुन रेखांकनातील विषयांकित खुल्या जागेवर योगा हॉल बांधणेसाठीचा प्रस्ताव आहे.

सदर खुल्या जागेच्या सिटी सर्व्हे नंबरच्या उता-यावर महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांचे नांव आहे. परंतु म्हाडाने सदर रेखांकनातील खुली जागा लेखी ताबे पावती देवुन तत्कालीन मुख्याधिकारी,अहमदनगर नगरपालिका यांच्या ताब्यात दिल्याचे दिसुन येत आहे.

सावेडी सिव्हील हडको कॉलनीमधील नवनित सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.यांनी संस्थेच्या सर्व रहिवाश्यांची संमती घेवून ठरावाची प्रत सादर केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दि.०२/१२/२०२० रोजीच्या अधिसुचनेव्दारे लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्र ३.४.७ मधील तरतुदी स्पष्ट आहेत. उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार रेखांकनातील खुल्या जागेत या हॉलचे बांधकाम अनुज्ञेय होईल.

तथापी मंजुर रेखांकनातील खुली जागा ही रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असून ते इतर कोणासाठी विक्री अथवा भाडयाने देता येणार नाही. तसेच ती जागा व हॉल रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

अर्जदार संस्थेने प्रस्तावित योगा हॉल बांधकामाची नकाशे सादर करून त्यास मंजुरी घेणे बंधनकारक आहे. खुल्या जागेत UDCPR मधील तरतुदीनुसार खुल्या जागेच्या १०% इतके तळमजला बांधकाम व ५% पहिला मजला बांधकाम अनुज्ञेय आहे.

खालील अटींच्या अधिन राहुन सावेडी नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३ मधील खुली जागा (आपनस्पेस ) क्षेत्र २४८२.४० चौ.मी.या जागेवर योगा हॉल बांधणेसाठी योग विद्या धाम संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.सुभाष पांढरे यांना परवानगी देण्यास हरकत नाही.

१.विषयांकीत खुल्या जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. सदर जागेचा कोणत्याही वाणीज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

२.विषयांकित खुल्या जागेचा नियमबाहय अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकस्न परवानगी रद्द करून खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

३.सदर रेखांकनातील खुली जागा भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

४.विषयांकित खुली जागा मंजुर रेखांकनातील भुखंडधारकांस /नागरीकांस विनामुल्य वापर करून देणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५.विषयांकित खुल्या जागेची मालकी अहिल्यानगर महानगरपालिकेचीच राहिल.

६.ओपन स्पेसमध्ये केवळ खुली जागा म्हणून वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

७.खुल्या जागेत कोणतेही बांधकाम करण्यापुर्वी महानगरपालिकेकडे BPMS प्रणालीव्दारे ऑनलाईन बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेची परवानगी घेतल्या शिवाय कुठलेही बांधकाम करता येणार नाही.

नमुद अटींवर अर्जदार योग विद्या धाम संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.सुभाष पांढरे,सावेडी यांना, नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.१९४/९३ मधील खुली जागा (आपनस्पेस ) क्षेत्र २४८२.४० चौ.मी. देणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |